RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ८४(१३)] गुरुवार, जून २३, २०२२/आषाढ २, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २३२

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जून २०२२

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस ०९२०/प्र.क्र.१५४/राउशु-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती नियम,१९६६ मध्ये आणखी सुधारणा करून पुढील नियम तत्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) चे कलम १४३ च्या पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (बी), (सी), (एफ) आणि (यु) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :-

१. या नियमांना, महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती (सुधारणा) नियम, २०२२, असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ (यापुढे यास "प्रधान नियम" असे संबोधावे) च्या नियम ८ मधील उप नियम (२) नंतर खालील उप नियम समाविष्ट करण्यात यावा, जसे की :-

"(२अ) जेथे स्थानिकरित्या उत्पादित इतर फुले/फळे यांचा किण्वन होणारा पदार्थ म्हणून वापर केला असेल, तिथे उचित मंजूर प्रक्रियेद्वारे "व्हर्ट" तयार केले जाईल."

३. मुख्य नियमांना जोडलेल्या “नमुना-I” मधील,

(i) अट क्रमांक २२ मध्ये “मळी/मोहाफुले” **या शब्दाऐवजी** “मळी /मोहाफुले/इतर किण्वन युक्त पदार्थ” हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(ii) परिशिष्ट “ड” मध्ये “मळी/मोहाफुले” **या शब्दाऐवजी** “मळी /मोहाफुले/इतर किण्वन युक्त पदार्थ ” हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 23rd June 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS0920/C.R.154/EXC-2.- Whereas, the Government of Maharashtra is considers that the following rules further to amend the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966 should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (b), (c), (f) and (u) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966, as follows namely :-

1. These rules may be called the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor (Amendment) Rules, 2022.

2. In rule 8 of the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966 (hereinafter referred to as "the principal Rules"), after sub-rule (2) the following sub-rule shall be inserted, namely :-

"(2a) where the other flowers and fruits which are produced locally used as fermentative base, the wort shall be prepared by appropriate approved Process."

3. In Form I, appended to the principle rules,

(*i*) in condition No. 22 for the words "molasses/ mhowra flower" the word "molasses/ mhowra flower/other fermentative base" shall be substituted;

(*ii*) in appendix 'D' for the words "molasses/mhowra flower" the words "molasses/ mohwra flower/other fermentative base" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.